अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण आदेश

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका
जावक:- अति.म.आ.(ज)/साप्राव/३०५२
दिनांक:- ०६/०८/२०२०

- : कार्यालयीन आदेश :-

**विषय : 'आर्ट ऑफ लिव्हिंग' या संस्थेचे 'आरोग्य व आनंद' या विषयावर मनपा सेवकांसाठी मोफत ऑनलाईन शिबीर आयोजित करणेबाबत.**

सध्या संपूर्ण जगासह भारतामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव झाला असून, त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी व त्याचा प्रसार रोखण्यासाठी महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्टा करीत आहेत. ही जबाबदारी पार पाडत असताना अधिकारी व कर्मचारी अग्रभागी कार्यरत असून, कोव्हीड केअर सेंटर, स्वॅब सेंटर, अलगीकरण केंद्र व प्रतिबंधीत क्षेत्रांमध्ये काम करीत आहेत.

अशा परिस्थितीमध्ये अधिकारी/कर्मचाऱ्यांचे मनोबल व प्रतिकारशक्ती वाढविणे गरजचे आहे. तथापि, अधिकारी/कर्मचाऱ्यांना ध्यानधारणा, प्राणायाम, इत्यादींचा सराव नियमितपणे अत्यावश्यक आहे.

या अनुषंगाने आर्ट ऑफ लिव्हिंग या संस्थेचे श्री. मंगेश निरवणे यांनी पुणे महानगरपालिका अधिकारी/सेवकांसाठी 'आरोग्य आणि आनंद' या विषयावर दोन दिवस प्रत्येकी दिड तासाचे विनामूल्य ऑनलाईन शिबीर आयोजित करण्याची तयारी दर्शविली आहे.

| प्रशिक्षणाचा विषय | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| आरोग्य आणि आनंद | दि. ८ व ९ ऑगस्ट, २०२० | सायंकाळी ६.०० ते ७.३० (१० मिनिटे अगोदर – जॉईन होणे) |

त्यानुषंगाने आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. मंगेश निरवणे यांनी शिबिरामध्ये खालील बाबींचा समावेश राहील, असे कळविले आहे.

१. सदर ऑनलाईन शिवीर http://tiny.cc/HHW_AOL या लिंकद्वारे व्हाट्सअॅपवर आयोजित करणेत येईल. (http://tiny.cc/HHW_AOL)

२. सदरचे शिबीर सुट्टीच्या दिवशी स्वत:च्या मोबाईल किंवा लॅपटॉपवर उपलब्ध असणार आहे. .

३. साधारणपणे ५०० अधिकारी /सेवक एका वेळेस ऑनलाईन शिबिरास उपस्थित राहू शकतील.

४. प्रत्येक दिवशी एक ते दिड तास याप्रमाणे दोन दिवस शिबीर आयोजित करणेत येईल.

५. शिबीर विनामूल्य असणार आहे.

६. शिबिरात प्राणायाम, भस्त्रिका प्राणायाम, आरोग्यदायी ध्यानधारणा, संतुलित आहार, इत्यादी बाबींच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात येईल.

तरी पुणे महापालिका आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ संवर्गातील इच्छुक अधिकारी/सेवकांनी 'आर्ट ऑफ लिव्हिंग' संस्थेमार्फत आयोजित केलेल्या विनामूल्य ऑनलाईन शिबीराचा लाभ घ्यावा.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रति,
सर्व संबंधित खातेप्रमुख
सर्व संबंधित उप आयुक्त ( परिमंडळ विभाग)
सव संबधित महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालये )
पुणे महानगरपालिका

यांस आवश्यक कार्यवाहीसाठी

प्रत,
१) मा .महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका
२) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि/इ)
पुणे महानगरपालिका

माहितीसाठी .......